**OFFICE OF THE DISTRICT GOVT.PLEADER & PUBLIC PROSECUTOR, YAVATMAL**
**Ground Floor, District & Session Court Building, Yavatmal 445 001**
**Phone- 07232-251992, Fax- 07232-243596, email-pvg.dgpnpp.yavatmal@gmail.com**
जिल्हा सरकारी वकील तथा शासकीय अभियोक्ता कार्यालय, यवतमाळ
तळमजला, जिल्हा व सत्र न्यायालय इमारत, यवतमाळ ४४५ ००१
दूरध्वनी क्र. ०७२३२—२५१९९२ फॅक्स ०७२३२—२४३५९६
जा.क्र. पीव्हीजी/डिजीपी/नास/२७४/२०१२दि. १४/०३/२०१२

# नागरिकांची सनद

(दि. १४/०३/२०१२)

| | |
|---|---|
| १. शासकीय कार्यालयाचे नांव: | जिल्हा सरकारी वकील तथा शासकीय अभियोक्ता कार्यालय, तळमजला, जिल्हा न्यायालय, यवतमाळ<br><br>सहा. सरकारी वकील तथा अति.शासकीय अभियोक्ता कार्यालय, जिल्हा न्यायालय, पुसद<br><br>सहा. सरकारी वकील तथा अति.शासकीय अभियोक्ता कार्यालय, जिल्हा न्यायालय, दारव्हा<br><br>सहा. सरकारी वकील तथा अति.शासकीय अभियोक्ता कार्यालय, जिल्हा न्यायालय, पांढरकवडा(केळापूर) |
| २. शासकीय व्यवस्थेतील खात्याचे स्थान: | १. विधी व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई—३२<br>२. अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, बॅरक क्र.६, फ्रि प्रेस जनरल, नरिमन पाईंट, मनोरा आमदार निवाससमोर, मुंबई— ४०० ०२१ |
| ३. कार्यालयातर्फे पुरविण्यात येणा—या सेवा: | राज्याचे कायदेविषयक कामकाज यवतमाळ जिल्हयाकरिता करणे व सर्व त—हेचे दिवाणी व तत्ससंबंधीत दावे शासनाचे वतीने चालविणे.<br><br>तसेच शासनाकरिता फौजदारी खटल्याचे कामकाज अभियोग पक्षाचे वतीने चालविणे. |
| ४. कोणत्या कायद्यानूसार/नियमानूसार/ : | महाराष्ट्र विधी अधिकारी,(नेमणूक, सेवेच्या शर्ती व मोबदला) नियम, १९८४, **Maharashtra Law Officers(Appointment, Conditions of Service & Remunaration) Rules, 1984** शासनाचे कायदेविषयक कामकाज संचालन नियम,१९८४, **The Rules for the Conduct of the Legal Affairs of Government, 1984** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ **(Civil Procedure Code,1908** फौजदारी दंड प्रक्रिया संहिता,१९७३ **(Criminal Procedure Code, 1973)** |

...२

| | |
|---|---|
| ५. कार्यालयाच्या सेवा कोणाला दिल्या : जातात. | न्यायालयातील दिवाणी व तत्सम खटल्याचे कामकाज शासनाचे वतीने चालविणे.<br>न्यायालयातील फौजदारी खटल्याचे कामकाज सत्र न्यायालयात अभियोग पक्षाच्या वतीने चालविणे. |
| ६. या सेवा कोण देते व कशा प्रकारे : | महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई—३२ यांनी नेमणूक केलेले जिल्हा सरकारी वकील व शासकीय अभियोक्ता, यवतमाळ व तसेच त्यांचे अधिनस्थ सहा.सरकारी वकील व अतिरिक्त शासकीय अभियोक्ते हे दिवाणी न्यायालयातील दावे व तत्सम प्रकरणे सरकारचे वतीने व तसेच सत्र न्यायालयातील खटले व तत्संबंधीत प्रकरणे अभियोग पक्षाचे वतीने चालवून सेवा प्रदान करतात. तसेच अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत गृह विभागाने नेमणूक केलेले किंवा पदोन्नत केलेले अतिरिक्त शासकीय अभियोक्ता हे सुध्दा जिल्हा शासकीय अभियोक्ता यांच्या नियंत्रणात सत्र प्रकरणे अभियोग पक्षाचे वतीने चालवून सेवा देतात. |
| ७. या सेवा दिल्या गेल्या नाहीत तर दाद: कोणाकडे मागावयाची | १. मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई—३२<br>२. अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई—२१<br>३. जिल्हा सरकारी वकील तथा शासकीय अभियोक्ता, यवतमाळ |
| ८. तक्रार करण्यासाठी कोणती बंधने : असतील | तक्रार करण्यासाठी कोणतीही बंधने नाहीत. |
| ९. सेवा पुरविण्याच्या कार्यपध्दतीचे : मुल्यांकन | सरकारी वकीलांच्या कार्यपध्दतीचे मुल्यांकन करण्या—साठी—<br>१. मा.विधी परामर्शी व प्रमुख सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई—३२मुंबई—३२ किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी<br>२. मा.सहसचिव, विधी व न्याय विभाग, सिव्हील लाईन, नागपूर, किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी<br>३. जिल्हा सरकारी वकील व शासकीय अभियोक्ता, यवतमाळ, जिल्हाधिकारी, यवतमाळ व जिल्हा पोलिस अधिक्षक, यवतमाळ यांची जिल्हा समिती. |

| | |
|---|---|
| १०. नागरिकांच्या जिल्हा सरकारी वकील व अभियोग शासकीय अभियोक्ता कार्यालयाकडून काय अपेक्षा आहेत. | : सत्र न्यायालयातील फौजदारी प्रकरणे सक्षमतेने पक्षाकरिता चालविणे व तसेच राज्य शासन व त्यांचे अधिका—यांचे व त्यांचे विरोधातील दिवाणी व इतर प्रकरणे सक्षमपणे चालविणे.<br>न्यायदान प्रक्रियेत सहकार्य करुन योग्य तो न्यायनिर्णय होण्यास मदत करणे. |
| ११. या कार्यालयातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी व त्यांची श्रेणी | : जिल्हा सरकारी वकील व शासकीय अभियोक्ता, यवतमाळ, वर्ग—१<br>सर्व सहा.सरकारी वकील तथा अतिरिक्त शासकीय अभियोक्ता, पुसद, दारव्हा, पांढरकवडा(केळापूर)वर्ग—१<br>सर्व वरिष्ठ लिपीक, लिपीक—नि—लघूलेखक, कनिष्ठ लिपीक, शिपाई यवतमाळ, पुसद, दारव्हा वर्ग—३ |
| १२. तक्रार निवारणासाठी संपर्क अधिकारी: | सरकारी वकील व अभियोक्त्यांच्या कामकाजाबाबत अथवा कार्यपध्दतीबाबत तक्रार असल्यास खालील अधिका—यांशी संपर्क साधावा:<br><u>जिल्हा पातळीवर—</u><br>जिल्हा सरकारी वकील व शासकीय अभियोक्ता, यवतमाळ<br><u>तालुका पातळीवर—</u><br>सर्व सहा. सरकारी वकील व अतिरिक्त शासकीय अभियोक्ता जे पुसद, दारव्हा, व पांढरकवडा येथे कार्यालय प्रमुख म्हणून कार्यरत असतील. |

नागरिकांची सनद उपलब्ध करण्यात आली असून, नागरिकांचे याबाबत काही मत अथवा टिपणी असलयास ते उपरोक्त नमुद पत्त्यावर कळविण्यात यावे. नागरिकांच्या सुचना स्वागतार्ह आहेत.

“सनदेत दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी वचन देणारे जिल्हा सरकारी वकील व शासकीय अभियोक्ता, यवतमाळ आणि ज्यांना वचन दिलेले आहे त्यांच्याशी बांधील आहे.”

स्वाक्षरी/—
(पी.व्ही.गाडबैले,पाटील)
जिल्हा सरकारी वकील व
शासकीय अभियोक्ता, यवतमाळ

प्रस्तूत नागरिकांची सनद जिल्हा सरकारी वकील व शासकीय अभियोक्ता, यवतमाळ यांनी स्वत: त्यांचे कार्यालयात व पुसद, दारव्हा, पांढरकवडा येथील कार्यालयात संबंधीत सहा.सरकारी वकील यांचे मार्फत आज दि. १४ मार्च, २०१२ रोजी दर्शनी भागास लावून प्रसिध्द केली.

स्वाक्षरी/—
(पी.व्ही.गाडबैले,पाटील)
जिल्हा सरकारी वकील व
शासकीय अभियोक्ता, यवतमाळ